शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०१/२०२५

| | | |
|---|---|---|
| डॉ.उदगांवकर मेघना दिपक<br>विनायक नगर,हरिपुर रोड,प्लॉट नं.७४,<br>मेघदिप बंगला, सांगली. | } | तक्रार अर्जदार |

विरूध्द

| | | |
|---|---|---|
| १. लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली,<br>राजनेमी परिसर,टिंबर एरिया,सांगली<br><br>२. श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय,<br>जयसिंगपूर,ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. | } | वि.प. |

लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली या शिक्षण संस्थेचे श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील सेवानिवृत्त शिक्षिका डॉ.उदगांवकर मेघना दिपक यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०१/०१/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार खालीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

प्राध्यापक स्टेज ५ (एजीपी १००००) च्या सहाव्या वेतन आयोगातील स्थाननिश्चीतीसाठी संदर्भएसयु/संलग्नता/स्थान/टे १/वंगार/२०९ दि.२९ डिसेंबर २०१८ चे शिवाजी विद्यापीठाच्या पत्रानुसार मी दि.२९/०१/२०१९ रोजी विद्यापीठाच्या आदेशानुसार माझ्या पदोन्नतीचा परिपुर्ण प्रस्ताव सर्व कागदपत्रांसह आणि विद्यापीठाने विहीत केलेली फी ची रक्कम भरून दिनांक २९/०१/२०१९ रोजी विद्यापीठाकडे सादर केला. पण विद्यापीठाने प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रदीर्घ उशीर केला. विद्यापीठाने मला १७ सप्टेंबर २०१९ रोजी बोलाविले. पण नियतवयोमानानुसार मी दि.३१/०७/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले.

मी, विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे व कॉलेजच्या सूचनेनुसार मुलाखतीसाठी मुलाखतीच्या निर्धारित तारखेस नेमूण दिलेल्या वेळी उपस्थित होते. माझ्या कॉलेजचे प्राचार्य व संस्थेचे प्रतिनिधी देखील उपस्थित होते. मात्र विद्यापीठाच्या मुलाखत घेण्याच्या तत्कालीन समितीने माझी मुलाखत घेण्यास माझ्या

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

सेवानिवृत्तीचे कारण देवून नकार दिला. परिणामी प्राध्यापक स्टेज ५ (एजीपी १००००) या स्तरावरील माझी पदोन्नती झाली नाही.

पुर्वलक्षी प्रभावाने मला प्राध्यापक स्टेज ५ (एजीपी १००००) चे सर्व लाभ देण्याविषयी आदेश/निर्णय देवून माझ्यावरील अन्याय दूर करावा ही विनंती.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

नाही.

**समितीची निरिक्षणे :**

शिवाजी विद्यापीठाचे परिनियम क्रमांक ३२५ अनुसार तक्रार निवारण समितीकडे केवळ विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त संस्था यामधील कार्यरत असणारे शिक्षक किंवा इतर सेवक यांनाच आपल्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता तक्रार निवारण समितीपुढे तक्रार अर्ज दाखल करता येतो. कार्यरत या शब्दाचा अर्थ जो तक्रार दाखल करीत आहेत तो तक्रार दाखल करण्याच्या तारखेला कार्यरत आणि सेवेत आहेत असा अर्थ होतो. सेवेतून निवृत्त झालेले शिक्षक किंवा कर्मचा-यांना तक्रार निवारण समितीपुढे आपले गा-हाणे मांडता येत नाही असे दिसून येते. तथापि, त्यांची तक्रार निवारण करिता इतर मार्ग उपलब्ध आहेत. त्याचा ऊहापोह याठिकाणी करणे आवश्यक नाही. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ रद्द् होवून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ हा पारित करण्यात आला आणि त्यात कलम ७९ (१) अनुसार तक्रार निवारण समितीच्या गठनाबाबत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्या कलमानुसार प्रत्येक विद्यापीठामध्ये राज्य सरकार किंवा त्यांचे कर्मचारी यांच्याविरूध्द् असलेल्या तक्रारी सोडून इतर सर्व तक्रारीच्या निवारणार्थ शिक्षक आणि इतर कर्मचारी, विद्यापीठ संलग्न स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त संस्था यांचे शिक्षक आणि इतर कर्मचारी यांना आपल्या तक्रारी तक्रार निवारण समितीपुढे मांडता येऊ शकतात. या कलमामध्ये महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम ३२५ मध्ये वर नमूद केलेला फरक (सेवेत/सेवेत नसलेल्या शिक्षक व कर्मचा-यांबाबत) असा फरक केलेला दिसून येत नाही. हे देखील खरे आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ८१ (१) अन्वये असे शिक्षक किंवा इतर कर्मचारी यांना सेवेतून निष्कासित करण्यात आल्याबाबत किंवा त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केले असेल याबाबत किंवा त्यांची पदावनती झाली असेल याबाबत तक्रारी दाखल करता येऊ शकतात. परंतु या कलम ८१ (१) अन्वये जे नियमितरित्या वयोमानानुसार निवृत्त झालले आहेत त्यांच्याबद्दल तरतूद केल्याचे दिसून

येत नाही. त्यामुळे या समितीचे मत असे आहे की, तक्रारदार नियतवयोमानानुसार सेवेतून निवृत्त झाले असल्या कारणांनी त्यांना या तक्रार निवारण समितीसमोर थेट येणे शक्य नाही. सबब, प्रस्तुतची तक्रार या समितीला तक्रारदार हे नियतवयोमानानुसार निवृत्त झाले असल्याकारणाने दाखल करुन घेता येणार नाही. त्यामुळे सदरची तक्रार नामंजूर करावी लागेल. सबब, ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतची तक्रार खारिज करण्यात येत आहे

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

दिनांक : 20 MAR 2025

Akadam

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

AHkolekar

**सदस्य**
**(श्रीमती ए.एच.कोलेकर)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)**

**सदस्य**
**(डॉ.व्ही.एन.शिंदे)**

**अध्यक्ष**
**(श्री.ए.व्ही.देशपांडे)**